# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 17/08/2020 (सोमवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर वार्ड क्र. 2, दत्तनगर चनकापुर येथे दिनांक 13/08/2020 चे 12.30 वा. ते दिनांक 16/08/2020 चे 16.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितेश रमेश गिरी, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्रं 2, दत्तनगर चनकापुर यांचे घराचे दाराचे कुलुप कोंडा अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील बेस्टान कपंनीचा टिव्ही कि. 7,000/– रु., सेटटॉप बॉक्स कि. 1,000/–रू., इंडीयन कपंनीचे सिलेंडर कि. 1,000/–रू. व एक स्पोर्टस वॉच किं. 100/–रु. असा एकुण कि. 9,100/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बंडु कोकाटे 9822943605 हे करीत आहे.

### दुखापत

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर लोहारा येथे दिनांक 15/08/2020 चे 14:30 वा. ते 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संतोष ठाकरे वय 39 वर्षे, रा. लोहारा व आरोपी नामे– रविंद्र ठाकरे, रा. लोहारा हे एकाच गावातील राहीवासी असून फिर्यादी हे गावातील चौकात बसले असता आरोपी हा फिर्यादीला म्हणाला की, ''माझे 200 रू दे'' तेव्हा फिर्यादीने कशाचे पैशे देवु असे म्हटले. याकारणावरून आरोपीने फिर्यादीला रोडवर खाली पाडले. त्यामुळे रोडवरील दगड फिर्यादीचे उजव्या डोळ्याचे भोवयीला लागल्यामुळे मार लागला. आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करून पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जयेन्द्र दांडेकर 8007109647 हे करीत आहे.

2) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर जय माता दी रेस्टॉन्टचे समोर गार्डन चौक एमआयडीसी बोरी येथे दिनांक 15/08/2020 चे 19:30 वा. ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अतुल संतोषराव बांते, रा. जय माता दी रेस्टॉन्टचे समोर गार्डन चौक, एमआयडीसी बोरी हे टेंभरी कडुन भारकस कडे त्यांचया सायकलने जात होते. त्यादरम्यान जय माता दी हॉटेल जवळ रोडचे बाजुला एक व्यक्ती मोटार सायकल अपघातग्रस्त स्थितीत पडलेला फिर्यादीला दिसला त्यामुळे फिर्यादीने त्याची मदत केली. त्यानंतर फिर्यादीने अपघातग्रस्त इसमाच्या मित्राला फोन केला असता तेथे तिन अज्ञात आरोपी लाल रंगाच्या शाईन मोटरसायकलनी आले. त्या तिघापैकी जाडसर व्यक्ती ज्याने लाल रंगााचा शर्ट व काळया रंगाचा पॅन्ट घातलेला होता त्याने फिर्यादीस लोखंडी रॉडने डोक्याला व हनुवटीवर मारहाण करून जखमी केले व पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जयेन्द्र दांडेकर 8007109647 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर